# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078

Address-sp office Bidco Road,Palghar west

E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.६१५ दिनांक २८.०७.२०२०

## कासा पोलीस ठाणे यांचेकडुन तंबाखुजन्य पदार्थ वाहतुक करणा-या आरोपीतावर कारवाई

दिनांक २६/०७/२०२० रोजी २१:३० वा.चे सुमारास चारोटी घोळ टोलनाका येथे मुंबई वाहीनीचे तिसरे लेनवर यातील आरोपीत मजकूर याने त्याच्या ताब्यातील मारुती सुझुकी एस.एक्स.४ कार नंबर एम.एच.०२/जे.पी.२५९८ हीच्यामध्ये १)७७,७९२/- रु. किंमतीचे केसर युक्त विमल पान मसाला निळया रंगाचे ४१६ पॅकेट, २) १३,७२८/- रु. किंमतीचे वि - १ तंम्बाखुचे जांभळया लाल रंगाचे ४१६ पॅकेट, ३) ४३,५६०/- रु. किंमतीचे केसर युक्त विमल पान मसाला लाल रंगाचे २२० पॅकेट, ४) ४,८४०/- रु.किंमतीचे वि - १ तंम्बाखुचे लाल रंगाचे २२० पॅकेट, ५)२,५०,०००/- रुपये किंमतीची सफेद रंगाची मारुती सुझुकी एस.एक्स.४ कार नंबर एम.एच.०२/जे.पी.२५९८ असा एकुण ३,८९,९२०/- रु. एकुण किंमतीचा तंबाखुजन्य पदार्थाचा माल हा मानवी आरोग्यास अपायकारक आहे व तो विक्री करिता वाहतुक करण्यास प्रतिबंध केलेला आहे हे त्यास माहीत असतांनाही त्याने शासकीय आदेशाची अवहेलना करुन तो माल वापी गुजरात येथुन भरुन अवैध्य रित्या विक्री करीता वाहतुक करुन घेऊन जात असतांना मिळून आला म्हणून <u>कासा पोलीस ठाणे</u> गुन्हा रजि.क्र. I १२६/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३२८, २७२, २७३, १८८ प्रमाणे, गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास सुरु आहे. सदर गुन्हयातील आरोपीत यांना दिनांक २७/०७/२०२० रोजी १८.०० वा अटक करण्यात आली आहे.

दि.२७/०७/२०२० रोजी पहाटे ५.३० वाजेच्या सुमारास चारोटी घोळ टोलनाका येथे मुबई वाहीनीचे तिसरे लेनवर यातील आरोपीत याने त्यांच्या ताब्यातील स्कोडा गाडी क्र.एम.एच.०२ सी.डब्लु १३९६ हीचे मध्ये १)२७,०००/-रु चे रजनिगंधा पान मसाला ब्लु रंगाचे ३० पॉकेट २)८६,४००/- रु चे राजश्री पानमसाला ब्लु रंगाचे ४०० पॉकेट ३)९६००/- रु चे केपी ब्लॅक लेबल तंबाखु काळया रंगाचे ४००पॉकेट ४)२२,५००/- बाबा ब्लॅक तंबाखु लाल काळया रंगाचे १५ पॉकेट ५)३०००००/-स्कोडा गाडी क्र.एम.एच.०२ सी.डब्लु १३९६ असा एकुण ४,४५,५००/- रु एकुण कीमतीचा तंबाखुजन्य पदार्थाचा माल हा मानवी आरोग्यास अपायकारक आहे व त्यावर महाराष्ट्र शासनाने अधिसुचनाद्वारे साठा/ वितरण/विक्री/उत्पादन व वहातुक करण्यास प्रतिबंध केलेला आहे. हे त्यास माहीत असतानाही त्याने शासकीय आदेशाची अवहेलना करुन तो माल वापी गुजरात येथुन भरुन अवैद्ध रित्या विक्री करीता वाहतुक करीत असताना मिळुन आला म्हणुन <u>कासा पोलीस ठाणे</u> गुन्हा रजि.क्र. I १२७/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३२८,२७२,२७३,१८८ प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

सदरची कारवाई सहा.पोलीस निरीक्षक श्रीमती जायभाये, प्रभारी अधिकारी कासा पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली कासा पोलीस ठाणेचे अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.

Scanned with CamScanner